दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांच्या आरोग्य सेवांचे प्रभावी समन्वयन व अंमलबजावणी करण्यासाठी तालुका स्तरावर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व समन्वय समित्या स्थापन करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: सीआरएफ-२०१७/प्र.क्र.६७/२०१७/अर्थसं (ई नस्ती क्र.-१८८०१५३)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :- १. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२,दि.२५.०९.२०२६

प्रस्तावना :-

सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती, मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णय दि.२५.०९.२०२६ अन्वये लागू करण्यात आल्या आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या भागात शासनातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

२. दुष्काळग्रस्त भागातील नागरीकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन, त्यांच्यापर्यंत आरोग्यविषयक जनजागृती, आरोग्य तपासणी, उपचार या आरोग्य सेवा वेळेत पोहोचविणे आवश्यक आहे. याकरीता दुष्काळग्रस्त भागातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक सेवा प्रभावीपणे पोहोचविण्याच्या दृष्टीने जिल्हानिहाय दुष्काळग्रस्त भागाचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या गठीत करण्याची व तालुका स्तरावर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

याकरीता दुष्काळग्रस्त भागातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक सेवा प्रभावीपणे पोहोचविण्याच्या दृष्टीने जिल्हानिहाय दुष्काळग्रस्त भागाचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासाठी तालुकास्तरावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. तालुकास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष :-

दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्णांना शासनाच्या विविध योजनांचा वेळेत लाभ मिळवून देण्यासाठी तालुकास्तरावर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन करण्यात यावा. सदर कक्षाच्या प्रमुखपदी

जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या समन्वयाने एका वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी व त्यांना सहाय्य करण्यासाठी लिपीक व टंकलेखक यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

सदर कक्ष तालुका स्तरावर पंचायत समिती कार्यालयामध्ये स्थापन करण्यात यावा. त्यासाठी आवश्यक सुविधा व संसाधने गट विकास अधिकारी यांनी प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावेत.

सदर कक्षाने गरजू रुग्णाला त्याच्या पात्रतेनुसार सर्वप्रथम आयुष्मान भारत योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना, धर्मादाय रुग्णालये व इतर आरोग्य योजनांमार्फत सर्वप्रथम उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावेत. जे रुग्ण उपरोक्त योजनेसाठी पात्र होणार नाहीत, अशा रुग्णांना अर्थ सहाय्य मिळवून देण्यासाठी त्यांचे अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयांमार्फत मंजूरीसाठी ऑनलाईन प्रणालीवर सादर करण्यात यावेत. यासंबंधाने गरजू रुग्णांना आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य कक्षामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावे.

तालुकास्तरीय कक्ष प्रमुख यांनी गरजू रुग्णांचा शोध उपजिल्हा रुग्णालय, ग्रामिण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, आशा सेविका यांच्या मार्फतीने घेण्यात यावा. सदर कक्षाने दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्ण उपचाराविना राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच दुष्काळग्रस्त भागामध्ये विविध आरोग्य विषयक संस्था व संघटना यांच्या समन्वयाने आरोग्य विषयक जनजागृती व आरोग्य शिबीरे आयोजन करण्यात यावीत.

तालुकास्तरीय कक्षाने दैनंदिन कक्षाच्या कामाचा व आरोग्य शिबीरांच्या अंमलबजावणीचा अहवाल जिल्हास्तरीय कक्षाकडे सादर करावा. जिल्हास्तरीय कक्षाने सर्व तालुकास्तरीय कक्षांचा अहवाल संकलीत करुन मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष मंत्रालय यांना सादर करावा.

२. तालुकास्तरीय आरोग्यविषयक समिती :-

तालुका स्तरावर दुष्काळग्रस्त क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींचा आढावा घेऊन उपाययोजना करण्यासाठी खालीलप्रमाणे तालुकास्तरीय आरोग्यविषयक समिती गठीत करण्यात येत आहे:

अ.क्र.	पदनाम	पद
१.	संबंधित तालुक्याचे विधानसभा सदस्य	अध्यक्ष
२.	उप विभागीय अधिकारी (महसूल)	सह अध्यक्ष
३.	तहसिलदार	सदस्य
४.	गट विकास अधिकारी	सदस्य
५.	मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगर पंचायत	सदस्य
६.	तालुका आरोग्य अधिकारी	सदस्य

७.	वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालय	सदस्य
८.	वैद्यकीय क्षेत्रातील समाजसेवक (एकूण-०२)	अशासकीय सदस्य
९.	तालुका प्रतिनिधी, इंडियन मेडीकल असोसिएशन	सदस्य
१०.	तालुका प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन	सदस्य
११.	कक्ष प्रमुख, तालुकास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष	सदस्य सचिव

३. जिल्हास्तरीय आरोग्यविषयक समिती:-

दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील आरोग्याशी संबंधित बाबींचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय आरोग्यविषयक समिती पुढीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे:

अ.क्र.	पदनाम	पद
१.	जिल्ह्याचे पालकमंत्री	अध्यक्ष
२.	जिल्हाधिकारी	सह अध्यक्ष
३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य
४.	आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी नगर परिषद	सदस्य
५.	अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय	सदस्य
६.	जिल्हा शल्यचिकित्सक	सदस्य
७.	सह / उप धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी	सदस्य
८.	सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन	सदस्य
९.	जिल्हा समन्वयक, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना	सदस्य
१०.	जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ	सदस्य
११.	जिल्हा प्रतिनिधी, इंडियन मेडीकल असोसिएशन	सदस्य
१२.	जिल्हा प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन	सदस्य
१३.	वैद्यकीय क्षेत्रातील समाजसेवक (एकूण-०२)	अशासकीय सदस्य
१४.	कक्ष प्रमुख, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष	सदस्य
१५.	जिल्हा आरोग्य अधिकारी	सदस्य सचिव

४. अशासकीय सदस्यांच्या नेमणूका :-

तालुका व जिल्हा स्तरीय समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नेमणूका मा. पालकमंत्री यांच्या मान्यतेने करण्यात याव्यात. दुष्काळाच्या पार्श्वभूमिवर वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्तिंच्या नेमणूका समितीवर करण्यात याव्यात.

५. जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय आरोग्यविषयक समित्यांचे कार्ये:

क) नागरीकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन, जनजागृती करणे, आरोग्य तपासणी, उपचार आणि आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आढावा घेणे.

ख) सदर समित्यांच्या बैठकीकरीता विविध आरोग्य योजनांच्या जिल्हा समन्वयकांना तसेच तालुका/जिल्हा स्तरावर आरोग्य व सामाजिक क्षेत्रात कार्यरत संस्था व व्यक्ती यांना आमंत्रित करुन सहभागी करावे.

ग) जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्यांच्या बैठका महिन्यातून किमान दोन वेळा आयोजित करण्यात याव्यात.

घ) आरोग्य सुविधा मर्यादित असलेले, दुर्गम, मोठी लोकसंख्या असलेले तसेच आरोग्यविषयक अडचणी अधिक असलेले भाग ओळखून प्राधान्यक्रम निश्चित करणे.

ङ) दुष्काळाच्या परिस्थितीमुळे उद्भवू शकणाऱ्या किंवा स्थानिक पातळीवर आढळणाऱ्या आरोग्यविषयक समस्या, पिण्याच्या पाण्याशी संबंधित आरोग्य समस्या, उष्णतेशी संबंधित आजार तसेच अन्य स्थानिक आरोग्यविषयक गरजांचा आढावा घेणे.

च) संबंधित भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या शासकीय योजना / आरोग्य सुविधा नागरिकांना पोहोचविण्यासाठी आढावा घेणे.

छ) स्थानिक गरजेनुसार आरोग्य तपासणी शिबिरे, फिरते वैद्यकीय पथक, तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा, आवश्यक तपासण्या, औषधोपचार, आरोग्य जनजागृती तसेच इतर आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करण्याचे नियोजन करणे.

ज) महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक तसेच मधुमेह, रक्तदाब यांसारखे दीर्घकालीन आजार असलेल्या नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या आरोग्यविषयक उपाययोजनांचा लाभ उपलब्ध करुन देणे.

झ) जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, इंडियन मेडीकल असोसिएशन (IMA), महाराष्ट्र वैद्यक परिषद (MMC), स्थानिक वैद्यकीय संघटना, महाराष्ट्र राज्य केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन, खासगी रुग्णालये, वैद्यकीय तज्ञ तसेच सेवाभावी संस्था व व्यक्ती यांना आरोग्यविषयक सहाय्य करण्याबाबत आवाहन करणे.

ञ) आरोग्य उपक्रमांसाठी आवश्यक डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, औषधे, तपासणी साहित्य, रुग्णवाहिका आणि अन्य वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध करुन देणे.

ट) दुष्काळग्रस्त भागात आरोग्य शिबीरे आयोजित करुन गरजू रुग्णांना स्थानिकरित्या औषधोपचार उपलब्ध करणे.

ठ) दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना आकस्मिकपणे उद्भवणाऱ्या गंभीर आजारांच्या व शस्त्रक्रियेच्या प्रकरणांत आयुष्मान भारत योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना

व धर्मादाय रुग्णालयांच्या योजना यांचा प्राधान्याने लाभ मिळवून देणे तसेच उपरोक्त लाभ मिळण्यास अपात्र असलेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून लाभ घेण्यासाठी मदत करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०६१८०६०५५४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2026.11.06 18:08:15 +05'30'

(गणेश पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
३. मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व सन्माननीय सदस्य, विधान परिषद / विधानसभा.
११. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई- ४०० ०१८.
१४. सहाय्यक संचालक (निधी व लेखा), मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / महानगरपालिका आयुक्त
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१९. निवड नस्ती.